| MHKO140003102023 | नियमित **दिवाणी दावा क्र.६७/२०२३**<br>**पांडुरंग ज्योती भोसले**<br>**वि.**<br>**हरी रामा भोसले** |
|---|---|

**<u>निशाणी क्र.१४ खालील आदेश</u>**

[दिनांक १८.०२.२०२५ रोजी पारित]

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र.९ यांनी दिवाणी प्रक्रिया संहीता, १९०८ चे आदेश ३९ नियम १, २ अन्वये तात्पुरता मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्याद्वारे वादी यांनी अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र.१, २, ७, ९, १० ते १२ यांनी स्वतः अथवा इतरांचे मार्फत वादी क्र.९ यांना दावा मिळकतीमधून हाकलून काढू नये, तसेच दावा मिळकतीमधील झाडे तोडू नये आणि त्यांचे ताब्यास अडथळा निर्माण करू नये.

**<u>दावा मिळकतः–</u>**

२. **अ.** मौजे जंगमहट्टी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर या गावच्या हद्दीतील खाली नमुद केलेल्या जमिन मिळकती म्हणजे दावा मिळकती होय.

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| १. | ३८/२ | १.९७.०० |
| २. | ३९/२ | २.३८.०० |
| ३. | ८१/१ | १.७३.४०<br>पो.ख.०.०१.०० |
| ४. | ८१/३ | १.०९.०० |
| ५. | १६८ | ०.४२.५०<br>पो.ख.०.०२.०० |

| | | |
|---|---|---|
| ६. | २०३/३ | ०.०२.०० |

**ब.** मौजे जंगमहट्टी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर या गावच्या हद्दीतील गट नं.३६, क्षेत्र ५.४२.००आर, पो.ख. ०.१५.००, आकार ४.१२ पैकी ५.३८.००आर, आकार ४.०९ पैकी. यासी चतुःर्सिमा – पुर्वेस श्री. विजयाभाई पाटील, पश्चिमेस श्री. शिवाजी भावकू गावडे, दक्षिणेस श्री. विठ्ठल ज्योती गावडे व नारायण बाळू कलजी व उत्तरेस सौ. सिंधूबाई कृष्णा पवार यांची मिळकत आहे.

वर नमूद मिळकत दाव्याचा वाद विषय असून त्यास यापुढे दावा मिळकत असे संबोधण्यात येत आहे.

**<u>वादी यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे:</u>**

३. वादी यांनी असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही वादी आणि प्रतिवादी यांची एकत्र हिंदू कुटूंबाची आणि वडिलोपार्जित मिळकत आहे. सदर मिळकत ही वादी आणि प्रतिवादी यांचेकडे पूर्वापार प्रमाणे कब्जेवहिवाटीमध्ये आहे. सदर मिळकतीमध्ये वादी क्र.१ ते ८ यांचा १/३ इतका हिस्सा आहे, वादी क्र.९ यांचा १/३ हिस्सा आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ ते १२ यांचा १/३ हिस्सा आहे. वादी आणि प्रतिवादी हे त्यांचे सोईने विभक्त राहतात. परंतु दावा मिळकती ह्या त्यांच्या सामाईक कब्जेवहिवाटीमध्ये आहेत. त्यामध्ये आजपर्यंत सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी यांनी वादी यांचे वहिवाटीस अडथळा केला आहे. त्यामुळे वादी यांनी दावा मिळकतीमधील स्वतंत्र हिस्सा वेगळा करून मागितला. परंतु प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला आहे. त्यामुळे

त्यांनी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या कब्जेवहिवाटीस अडथळा निर्माण केला आहे आणि त्यांना हाकलून काढणेचा प्रयत्न केला आहे. वादी यांना दावा मिळकतीमध्ये कष्ठ मशागत करणे अडचणीचे झाले आहे. तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकत कलम–ब मधील वहिवाटीचा रस्ता अडवून वादी क्र.९ यांचे ऊसाचे पिक अडवले आहे. त्याबाबत वादी क्र.९ यांनी तहसिलदार चंदगड यांचेकडे तक्रार दाखल केलेली आहे. त्यामध्ये तहसिलदार चंदगड यांनी वादी यांचा अर्ज मंजूर केलेला आहे. सदर आदेशाविरुद्ध उपविभागीय अधिकारी गडहिंग्लज यांचे समोर अपील प्रलंबित आहे.

४. तसेच, जून २०२२ मध्ये प्रतिवादी यांनी संगनमताने दावा मिळकतीमधील काटेरी झाडे झुडपे काढून अडथळा निर्माण केला आणि वादी यांच्याशी हुज्जत घातली. प्रथम दर्शनी दावा वादी यांचे बाजूने असून वादी यांचे बाजूने मनाई आदेश पारित न झाल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

**वादी यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

५. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास नि.क्र.२३ खाली लेखी म्हणणे दाखल केले आहे आणि त्यांनी अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे नमूद केले आहे आणि सदर तांत्रीक मुद्दयांवर दावा खारीज होण्यास पात्र आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीचे वाटप वादी आणि प्रतिवादी यांचेमध्ये फार पूर्वीपासून झालेले आहे. वादी क्र.९ यांचे दावा जमिनीपैकी त्यांचे हिश्श्याचे क्षेत्र स्वतंत्रपणे वहिवाट करत आहे. तसेच, दावा मिळकत २ब म्हणजेच गट नं.३६ मध्ये वादी क्र.९, हे वादी आणि प्रतिवादी हे त्यांचे मालकीच्या

क्षेत्रामध्ये स्वतंत्ररित्या वहिवाट करत आहे. सदर मिळकतीचे ७/१२ पत्रकी त्यांचे नावे स्वतंत्रपणे नोंद झालेली आहेत. त्यामुळे वादी यांना दावा मिळकतीचे वाटप करून घेण्याचा अधिकार नाही. प्रतिवादी यांना त्रास देण्यासाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वादी क्र.९ यांनी न्यायालयापासून सत्य लपवून प्रस्तुतचा खोटा व बनावट अर्ज दाखल केलेला आहे. वादीचे बाजूने मनाई आदेश पारित झाल्यास प्रतिवादी यांच्या कायदेशीर अधिकारास बाधा निर्माण होणार आहे आणि त्यांच्या कब्जेवहिवाटीस अडथळा निर्माण होणार आहे. तसेच, प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सोयीचा समतोल हा प्रतिवादी यांचे बाजूने असून अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे सुविद्य विधीज्ञ ***श्री एन. एन. गावडे*** आणि प्रतिवादीतर्फे सुविद्य विधीज्ञ ***श्री ए. डी. ओउळकर*** यांचा युक्तीवाद ऐकला. माझे अवलोकनार्थ खालीलप्रमाणे वादप्रश्न/मुद्दे उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष हे कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | प्रथमदर्शणी सिद्ध दावा असल्याचे वादी शाबीत करतात काय?. | **होय** |
| ०२ | सोयीचा समतोल वादीच्या लाभात आहे काय ? | **होय** |
| ०३ | तात्पुरता मनाईहुकूम नाकारल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल असे वादी शाबीत करतात काय ? | **होय** |
| ०४ | काय आदेश ? | **अंतिम** |

| | | |
|---|---|---|
| | | **आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

७. *दिवाणी प्रक्रिया संहिता चे **आदेश ३९ नियम १** मधील तरतुदीनुसार, कोणत्याही दाव्यात शपथपत्राद्वारे किंवा अन्यथा,... (ग) दाव्यातील कोणत्याही वाद ग्रस्त मालमत्तेच्या संबंधात प्रतिवादी, वादीला त्याचा कब्जा काढून घेण्याची धमकी देत आहे अथवा त्याविषयी अन्यथा क्षती पोहचवत आहे, असे सिद्ध करण्यात आल्यास न्यायालयामार्फत दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत अशी कृती निरुद्ध करण्यासाठी आदेशाद्वारे तात्पुरता मनाई हुकुम देता येईल. तसेच कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढतांना दाव्यातील अंतिम निर्णयाबाबत अथवा गुणवत्तेबाबत अनुमान काढणे आवश्यक नाही. परंतु वादीने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, प्रथमदर्शनी सिध्द दावा आणि न्यायाचा समतोल त्यांचे बाजुने आहे.*

८. प्रस्तूत दावा वादी यांनी दावा मिळकतीचे वाटप होऊन स्वतंत्र ताबा मिळणे साठी दाखल केलेला आहे. वादी यांचे मते, दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असून सरस निरस वाटप झालेले नाही. याउलट प्रतिवादी यांचे मते, दावा मिळकतीचे वादी आणि प्रतिवादी यांचे मध्ये वाटप झालेले आहे आणि ते त्यांच्या हिस्स्याप्रमाणे कायदेशीर कब्जेवहिवाटी मध्ये आहेत. दोन्ही पक्षांचे वादातील तथ्यांचे अवलोकन केले असता, या टप्प्यावर असे दिसून येते की, **दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित**

**मिळकत आहे काय? वादी आणि प्रतिवादी यांचे मध्ये सरस निरस वाटप झाले काय? आणि वादी मागणीप्रमाणे वाटप होऊन स्वतंत्र ताबा मिळण्यास पात्र आहे काय**? हे वादातील मुद्दे आहेत, आणि त्याबाबत दोन्ही पक्षांचे पुराव्याअंती गुणवत्तेवर निर्णय होणे आवश्यक आहे. परंतु तात्पुरता मनाई आदेश होण्याकरिता, वादी यांनी प्रथम दर्शनी दावा मिळकतीवर त्यांचा सामाईक कब्जा वहिवाट आहे हे शाबित करणे आवश्यक आहे.

९. दोन्ही बाजूंचे सुविद्य विधिज्ञ यांनी त्यांचे युक्तिवादादरम्यान दाव्यातील तथ्यांची मांडणी केली आहे. तसेच त्यांनी अभिलेखावर दाखल दस्त न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे. वादीतर्फे सुविद्य विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला आहे की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी रस्ता अडविला आहे आणि वादीचे ताब्यास अडथळा निर्माण केला आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, दावा मिळकत ही वादी आणि प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत आहे आणि सोयीप्रमाणे वादी आणि प्रतिवादी यांचे कब्जेवहिवाटी मध्ये आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना वादीचे सामाईक कब्जेवहिवाटीस अडथळा निर्माण करता येणार नाही. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, प्रथमदर्शनी सिद्ध दावा, सोयीचा समतोल वादीचे बाजूने आहे आणि तात्पुरता मनाई आदेश पारित न झाल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, वादी यांचे कायदेशीर काब्जेवाहीवटीस बाधा अथवा अडथळा निर्माण होत असेल, मिळकती मधून काढून टाकण्याचा प्रयत्न (ouster) करत सहहिस्सेदार यांचे विरुद्ध मनाई आदेश पारित करता येतो, हे कायद्याचे प्रस्थापित तत्व आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

१०. याउलट प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला आहे की, मूळ दावा हा चालण्यास पात्र नाही. कारण वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे आणि खोटे नमूद केले आहे. त्यामुळे वादी यांचे क्षेत्र कोठे आहे हे सिद्ध होत नाही. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, वादी यांनी संयुक्त कुटुंबाच्या सर्व मिळकती दाव्यात शामिल केलेल्या नाहीत, तसेच इतर सहहिस्सेदार यांना देखील पक्ष म्हणून समाविष्ठ केलेले नाही. त्यामुळे देखील हा दावा चालण्यास पात्र नाही. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, वादी यांनी दाव्यासोबत तात्पुरता मनाई हुकुम मिळणेसाठी चा अर्ज दाखल केलेला नाही. प्रस्तुत अर्ज त्यांनी उशिराने दाखल केला आहे. या अर्जातील नमूद कथने वादी यांनी मूळ दाव्यामध्ये केलेली नाहीत. रस्ता अडविल्याबाबत मूळ दाव्यात नमूद केलेले नाही. त्यामुळे त्याबाबत मनाई आदेश पारित करता येणार नाही. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, रस्ता आहे किंवा नाही याबाबत देखील वादी यांनी स्पष्ठ कथन केलेले नाहीत. वादी यांनी महत्वाची तथ्य लपविली आहेत आणि त्यामुळे ते मागणीप्रमाणे मनाई आदेश मिळण्यास पात्र नाहीत. त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

११. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी मूळ दाव्यात रस्ता अस्तित्वात असले बाबत अथवा त्याबाबत मनाई आदेश मिळणे बाबत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच प्रस्तुत अर्जात त्यांनी रस्ता अडवले बाबत कथन केले आहे. परंतु त्या एकमेव कारणावरून अर्ज नामंजूर करता येणार नाही. कारण वादी यांनी प्रस्तुत अर्जात, प्रतिवादी यांनी रस्ता अडवू नये, अशा आशयाचा मनाई आदेश मिळण्याची विनंती केलेली नाही. त्यांनी अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी यांनी वादीस हाकलून

काढू नये, मिळकती मधील झाडे तोडू नये, तसेच अडथळा निर्माण करू नये. त्यामुळे दावा मिळकत क्र. २ब मध्ये पूर्वापार रस्ता आहे किंवा नाही? तसेच प्रतिवादी यांनी सदर रस्ता अडविला आहे किंवा नाही? हा या अर्जातील वादातील मुद्दा नाही. त्यामुळे त्याबाबत कोणतेही निष्कर्ष नोंदविणे योग्य होणार नाही.

१२. त्यामुळे, याठिकाणी वादी यांनी त्यांचा दावा मिळकतीवरील सामाईक कब्जा शाबित केला आहे किंवा नाही, हे पाहणे आवश्यक आहे. वादी यांनी दावा मिळकतीच्या महसूल नोंदी आणि फेरफार दाखल केले आहे. गट क्र. ३८/२ च्या ७/१२ उताराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर गटामध्ये एकूण १ हे ९७ आर क्षेत्र आहे. तसेच वादी आणि प्रतिवादी यांची १ हे १५६० आर क्षेत्रावर सामाईक कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येते. तसेच काही प्रतिवादी यांचे नावाची स्वतंत्र नोंद झालेली आहे. गट क्र. ३९/२, ८१/१, ८१/३,१६८, २०३/३, च्या ७/१२ उताराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी आणि प्रतिवादी यांचे नावाची स्वतंत्र नोंद झालेली आहे.

१३. वादी यांनी दावा मिळकत क्र. २ब, गट क्र. ३६ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे, सदर दस्ताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. ९ यांचे नावे स्वतंत्र रित्या १ हे ४६ आर क्षेत्राची नोंद झालेली आहे. तसेच इतर वादी व प्रतिवादी यांचे नावाची देखील स्वतंत्र नोंद झालेली आहे. वादी यांनी दावा मिळकतीचे जुने ७/१२ उतारे तसेच फेरफार नोंदी दाखल केलेल्या आहेत. त्यावरून प्रथम दर्शनी दावा मिळकती ह्या वादी आणि प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकती असल्याचे दिसून येते. दावा मिळकत क्र. २ब, गट क्र. ३६, ही मिळकत वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार रामा झिमाना

भोसले, सोमी सखाराम भोसले, आणि विठोबा ज्योती भोसले यांनी कुळ कायदा कलम ३२ ग नुसार खरेदी केली असल्याचे दिसून येते.

१४. वादी आणि प्रतिवादी यांचे नावाची नोंद ७/१२ पत्रकी स्वतंत्र असल्याचे दिसून येते. परंतु त्यावरून वादी आणि प्रतिवादी यांचे मध्ये सरस निरस वाटप झाले हे तथ्य शाबित होत नाही. कारण या टप्प्यावर वाटप झालेबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. उलट वादी यांचे कथांवरून असे दिसून येते की, वादी आणि प्रतिवादी यांचे मध्ये वाटप झाले नसले तरीही ते त्यांचे सोयीप्रमाणे स्वतंत्र काब्जेवहिवाटी मध्ये आहेत आणि मिळकत कसत आहेत. सदर तथ्य प्रतिवादी यांनी अंशतः मान्य केलेले आहे. प्रतिवादी यांचे मते वादी आणि प्रतिवादी हे त्यांचे वाटपानुसार हिस्स्याप्रमाने स्वतंत्र कब्जेवहिवाटी मध्ये आहेत. यापूर्वी चर्चा केल्याप्रमाणे, वाटपा बाबतचा वाद दोन्ही पक्षांचे पुराव्यावरून शाबित होणार आहे.

१५. प्रस्तुत अर्ज हा वादी क्र. ९ यांनी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीचे ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. ९ यांचे नावाची, गट क्र. ३८/२ वगळता इतर मिळकतीबाबत स्वतंत्र नोंद झालेली आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे वाटप झाले आहे, हे प्रतिवादी यांचे कथन खरे आहे असे गृहीत धरले तरीही, वादी क्र. ९ यांची दावा मिळकती मध्ये ७/१२ प्रमाणे नमूद क्षेत्रावर कब्जा असल्याचे प्रथम दर्शनी सिद्ध होते.

१६. मूळ दावा हा वाटप होऊन स्वतंत्र कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी पुराव्याविना दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे अथवा सर्व

मिळकती दाव्यात शामिल केलेल्या नाहीत, याबाबत अनुमान काढता येणार नाही. सदर मुद्दा हा मूळ दाव्यात विचारात घेऊन निकाली निघणार आहे. या ठिकाणी प्रथम दर्शनी वादी क्र. ९ यांचा दावा मिळकतीवर सामाईक कब्जा आहे हे सिद्ध होते, या मतास मी पोहचत आहे.

१७. कायद्याचे हे प्रस्थापित तथ्य आहे की, सहहिस्सेदार अथवा सह मालक यांचे विरुद्ध मनाई आदेश, काही अपवाद वगळता, पारित करता येणार नाही. परंतु प्रतिवादी यांचे कडून वादीचे प्रत्यक्ष कब्जास अडथळा निर्माण होत असेल, अथवा वादी यांनी मिळकतीचे कब्जातून बेदखल करण्याची शक्यता असेल, अशा परिस्थितीत सह हिस्सेदार यांचे विरुद्ध मनाई आदेश पारित करता येतो.

१८. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे वादी यांना दावा मिळकतीचे कब्जातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत आहे, तसेच अडथळा निर्माण करत आहेत. या आदेशात वर नमूद केल्याप्रमाणे, वादी आणि प्रतिवादी हे दावा मिळकतीचे कब्जे मध्ये आहेत आणि ते स्वतंत्ररित्या सोयीप्रमाणे अथवा हिस्स्याप्रमाणे (वादातील मुद्दा) वहिवाट करत आहेत. अशा परिस्थितीत वादी यांचा दावा मिळकतीवरील कब्जाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास वादी यांचे नुकसान होणार आहे आणि त्यांचे हक्कास बाधा निर्माण होणार आहे. याउलट प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण, त्याच्याच कथनाप्रमाणे वादी आणि प्रतिवादी हे वाटपाने हिस्स्याप्रमाणे स्वतंत्र कब्जेत आहेत. त्यामुळे वादी यांचे दावामिळकतीवरील कब्ज्यास हरकत करू नये, असा आदेश पारित केल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही, या मतास मी पोहचत आहे.

१९. उपरोक्त चर्चेनंतर मी या निष्कर्षास पोहचत आहे की, तात्पुरता मनाईहुकूम आदेश मिळण्यासाठी वादी यांनी प्रथम दर्शनी दावा त्यांचे बाजूने असल्याचे सिद्ध केले आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचा मिळकतीवरील हक्क नाकारल्यामुळे, प्रतिवादी यांनी वादीच्या कायदेशीर ताब्यास हरकत अडथळा निर्माण करून हुसकून लावण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच मनाई आदेश या टप्प्यावर पारित न झाल्यास वादी यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे, या मतास मी पोहचत आहे.

सबब वादप्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**वादप्रश्न क्र. ४ साठी**

२०. उपरोक्त चर्चेनंतर मी या निष्कर्षास पोहचत आहे की, वादी यांचा तात्पुरता मनाई हुकुम मिळणेसाठीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. वादप्रश्न ४ चे उत्तरासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र. १, २, ७, ९ ते १२ यांनी अथवा त्यांच्या मार्फत इतर कोणीही दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत वादी क्र.९ यांच्या दावामिळकतीवरील सामाईक कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा निर्माण करु नये, तसेच वादी यांना हुसकावून लाऊ नये, असा तात्पुरता मनाई हुकुम आदेश पारीत करण्यात येत आहे.

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2025.02.18 12:38:34 +0530

दिनांक १८/०२/२०२५

(वामन दि. जाधव)
सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
चंदगड, जिल्हा कोल्हापूर.
(**संकेतांक– एमएच ०३१४३**)